**पाहिजेत**

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

**शैक्षणिक**

शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय

पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा

मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २७६ वा | सोमवार, दि. १५ जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# रोहित पवार यांची तब्येत खालावली; सलाईन लावण्यास नकार

## आजपासून नामदेव पायरीजवळ आंदोलन





**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** विनाअट दोन लाखांपर्यंत सरसकट शेतकरी कर्जमाफी करण्यात यावी. या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे सुरु केलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा रविवारी तिसरा दिवस होता.

तिसऱ्या दिवशीही सरकारकडून मागण्यांबाबत तोडगा निघाला नाही. अन्नत्याग केल्याने रोहित पवार यांची तब्येत बिघडली आहे. तरीही ते आंदोलनावर ठाम आहेत. सोमवारपासून विठ्ठल मंदिरासमोरील नामदेव पायरी येथे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा त्यांनी सरकारला दिला आहे.

आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी रोहित पवार यांचा बीपी आणि शुगर कमी झाली आहे. त्यांना अशक्तपणा आला असल्याने डॉक्टरांनी सलाईन लावण्याची गरज असल्याचे सांगितले आहे. मात्र, सरकारकडून मंत्री गिरीश महाजन हे मध्यस्थी करण्यासाठी तोडगा काढण्यासाठी आंदोलनस्थळी भेट देणार आहेत. ते आल्यानंतरच सलाईन घेवू, असे रोहित पवार यांनी सांगितले आहे.

राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी पंढरपूरला अन्नत्याग आंदोलनस्थळी उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा दिला. सरकारने कोणत्याही अटी शर्ती न लावता सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी यावेळी केली. या आंदोलनाच्या बाजूने पूर्ण ताकदीने उभे राहण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शेकापचे नेते जयंत पाटील, खासदार बजरंग सोनवणे, खासदार निलेश लंके, आमदार सुनील भुसारा, भावनाताई घाणेकर यांनी अन्नत्याग आंदोलनाला उपस्थित राहून पाठिंबा दिला.

### कुटुंबीय झाले भावूक

शेतकऱ्यांच्या विना अट कजमार्फीसाठी रोहित पवार यांनी पंढरपूर येथे 12 जूनपासून अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. आंदोलनाला तीन दिवस झाले तरी सरकार लक्ष देत नाही. त्यातच रोहित पवार यांची तब्येत बिघडू लागली आहे. या आंदोलनस्थळी पहिल्या दिवसापासूनच रोहित पवार यांचे वडील राजेंद्र पवार हे ठाण मांडून बसले आहेत. तर रविवारी रोहित पवार यांचे यांचं संपूर्ण कुटुंब पंढरपूरच्या आंदोलनात दाखल झाले आहे. वडील राजेंद्र पवार, आई सुनंदा पवार, पत्नी कुंती पवार, मुलगा शिवांश आणि आनंदिता हे सर्व रोहित पवार यांना पाहून भावूक झाले आहेत. सरकारने त्वरीत दखल घेण्याची मागणी त्यांनी केली आहे.

पप्पांचे आंदोलन आणि त्यांचा सुकलेला चेहरा पाहून रोहित पवार यांच्या मुलांच्या डोळ्यात अश्रू आले. मुलांच्या डोळ्यातील अश्रू पाहून रोहित पवार भावुक झाले. मुलांचा हात हातात घेत त्यांनी धीर देण्याचा प्रयत्न केला. यावेळी आंदोलनस्थळी उपस्थित असलेल्या आंदोलनकर्त्यांचे डोळे पाणावले.

### संपुर्ण कर्ज माफी करा- जरांगे पाटील

शेतकऱ्यांसाठी रोहित पवार यांचे अन्नत्याग आंदोलन सुरु आहे. खर तर सरकारने या आंदोलनाची वेळच येवू द्यायला नको होती. मात्र, सरकार शेतकरी म्हटले की द्यायला तयार होत नाही. नियम अटी लादून बेजार करत आहे. माझे सरकारला म्हणणे आहे की, एकदाचीच संपुर्ण कर्जमाफी करा, कटकट ठेवू नका, अशी मागणी मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारकडे केली आहे.

### राज्यातील सगळा शेतकरी एकवटणार आहे

रोहित पवार यांनी मनोज जरांगे यांना शेतकरी कर्जमाफीच्या जाचक अटी आणि आंदोलनाचे कारण याविषयी माहिती दिली. त्यानंतर मनोज जरांगे यांनी उपस्थितांना संबोधित केले. रोहित पवार हे बळीराजासाठी आंदोलनाला बसले आहेत. शेतकऱ्याला न्याय मिळालाच पाहिजे. हा न्याय मिळावा यासाठी राज्यातील सगळा शेतकरी एकवटणार आहे. त्यात कोणतेही दुमत असण्याचे कारण नाही, असे भाष्य यावेळी त्यांनी केले. तसेच शेतकरी वाचला तर आपण वाचणार आहे. शेतकरी वाचला नाही तर राज्य आणि देश कसा चालणार, असा सवालही त्यांनी केला.

### तुम्ही आमच्या पार्टीत या...

पुढे बोलताना मनोज जरांगे यांनी मिश्किल भाष्य करत रोहित पवार यांना आमच्या बाजूने यावे, असे आवाहन केले. रोहित पवार यांच्या आंदोलनला चांगला प्रतिसाद आहे. फक्त थोडा घोळ आहे. तुम्ही कितीही पोटतीडकीने केलं तर रोहित पवार यांच्या आंदोलनाला राजकारण हेच म्हटले जाणार आहे. त्यामुळे तुम्ही आमच्या पार्टीत या, अशी मिश्कील टिप्पणी मनोज जरांगे यांनी केली. तसेच आमच्या पार्टीत खूप मचळा आहे. तुम्ही कुठेही बसू शकता, असे जरांगे म्हणाले. तसेच तुम्ही कोणतीही मागणी केली तरी कोणीच काही बोलू शकत नाही. पण तुमच्या पार्टीत आल्यावर प्रश्न सोडवणं खूप अवघड आहे. आमच्या पार्टीत आलं की खूप गर्दी होते. कोणतीही मागणी करता येते, असंही जरांगे म्हणाले.

### आपणही त्यांना शेतकरी म्हणून...

तुमच्या पोटतिडकीला किती महत्त्व दिले जाईल माहिती नाही. आपण शेतकऱ्यांसाठी बसलो आहोत. आपण या आंदोलनात तरी ही शेतकऱ्यांची लढाई आहे, असं समजावं. आपण काही रोहित पवार यांच्या राजकारणासाठी आलेलो नाहीत. ते शेतकऱ्यांसाठी लढत आहेत. आपणही त्यांना शेतकरी म्हणून साथ द्यायला हरकत नाही, असेही मत जरांगे यांनी व्यक्त केले.

# टेंभूतून रब्बी, उन्हाळी हंगामासाठी उचलले ११ टीएमसी पाणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गतवर्षी जिल्ह्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला असला तरी, डिसेंबर महिन्यापासूनच पाण्याची झळ बसू लागली. ही झळ कमी करण्यासाठी टेंभू उपसा सिंचन योजनेचे रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी आवर्तन सुरु करुन लाभ क्षेत्रातील पिकांना पाणी उपलब्ध करुन दिले.

टेंभू उपसा सिंचन योजना तब्बल १७२ दिवस (पाच महिने २० दिवस) अखंड सुरु होती. या कालावधीत ११ टीएमसी पाणी उचलून सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळाल्याने मोठा दिलासा मिळाला.

जिल्ह्यात गतवर्षी दुष्काळी पट्ट्यातील तालुक्यासह इतर तालुक्यात सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली. परंतू नोव्हेबर-डिसेंबर महिन्यापासून दुष्काळी भागासह टेंभू उपसा सिंचन योजनेच्या लाभ क्षेत्रात पाणी टंचाईची झळ सुरु झाली. त्यामुळे पिके पाण्याअभावी कोमेजू लागली.

यामुळे लाभक्षेत्रातील शेतकरी वर्गातून टेंभू योजनेचे आवर्तन सुरू करण्याची मागणी झाली. १५ डिसेंबर २०२५ रोजी रब्बी व उन्हाळी हंगामासाठी आवर्तन सुरू करण्यात आले. सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी पट्ट्यातील शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघाला. लाभक्षेत्रातील ७० हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले.



परिणामी ऐन दुष्काळात मोठा दिलासा मिळाल्याने 'टेंभू'च्या आवर्तनाने कायम दुष्काळी टापूत दुष्काळ सुसह्य झाला.

यावर्षी उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने पाण्याची मागणी वाढली होती. त्यामुळे आवर्तन उन्हाळा व टंचाईची परिस्थिती संपेपर्यंत अखेरपर्यंत सुरू ठेवण्यात आले. सर्वत्र टंचाईसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. या परिस्थितीवर मात करण्यासाठी सर्व सिंचन योजना सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे टेंभू योजनेचे आवर्तन १५ डिसेंबर २०२५ रोजी सुरू करण्यात आले. ते तब्बल १७२ दिवस सुरू ठेवले गेले.

टेंभू योजनेच्या उन्हाळी आर्वतनामुळे सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील ७ तालुक्यांच्या लाभक्षेत्रातील दुष्काळी टापूतील सुमारे २२१ गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकालात निघाला आहे.या पाण्याने कऱ्हाड तालुक्यातील ६०० हेक्टर, कडेगावातील ९ हजार ९ हजार ३२५ हेक्टर, खानापुरातील १८ हजार ९७५ हेक्टर, तासगावातील ७ हजार ७०० हेक्टर, तर आटपाडी, कवठेमहांकाळ व सोलापूर जिल्ह्यातील सांगोला अशा सांगली, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील एकूण ८० हजार ४७२ लाभक्षेत्रापैंकी ७० हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले. त्यामुळे ऐन दुष्काळातही येथे दुष्काळाची तीव्रता जाणवली नाही.

रब्बी, उन्हाळी हंगामासाठी सुरू असलेले टेंभू सिंचन योजनेचे आवर्तन जूनच्या पहिल्या बंद झाले. हे आवर्तन तब्बल १७२ दिवस (पाच महिने, २० दिवस) अखंड सुरू होते. यासाठी कृष्णा नदीतून ११ टीएमसी पाणी उचलण्यात आले.

# खत म्हणून विकत होते चक्क मीठ!

## सोलापूरात १० लाखांच्या भेसळयुक्त खतांचा साठा जप्त



प्रतीकात्मक फोटो

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पाठखळ येथील मे. प्रहार उद्योग समूह व कृषी केंद्राच्या दुकान आणि गोदामावर कृषी विभागाने टाकलेल्या छाप्यात खत म्हणून मिठाची विक्री होत असल्याचा प्रकार उघडकीस आला.

या प्रकरणी १० लाख ४६ हजार ७८० रुपयांच्या भेसळयुक्त रासायनिक खतांचा साठा व विक्री केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध मंगळवेढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सतीश मनोहर भोसले (रा. पाठखळ) व रविराज शंकर कणसे (रा. सातारा) यांच्याविरुद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर जिल्हा कृषी अधिकारी आणि मंगळवेढा कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाठखळ येथील मे. प्रहार उद्योग समूह व कृषी केंद्राच्या दुकान आणि गोदामावर छापा टाकला होता.

या कारवाईदरम्यान खत म्हणून मिठाची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले. तसेच भेसळयुक्त रासायनिक खतांचा साठा करून त्याची विक्री केल्याचेही तपासात आढळून आले. संबंधितांकडे खत विक्रीसंदर्भातील बिले व आवश्यक कागदपत्रांची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्यांना संबंधित बिले सादर करता आली नसल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

हरिदास बोंगे यांनी दिलेल्या फियार्दीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फियार्दीनुसार, आरोपींनी ८ जून रोजी सायंकाळी सातपूर्वी बेकायदेशीररीत्या भेसळयुक्त रासायनिक खतांचा साठा करून त्याची विक्री केली. तसेच १० लाख ४६ हजार ७८० रुपयांच्या भेसळयुक्त खतांची निर्मिती व विक्री करून शासन आणि शेतकऱ्यांची दिशाभूल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे करीत आहेत.

# पीकअप जीप विहिरीत कोसळून एकाच कुटुंबातील 8 जणांचा मृत्यू; 6 जखमी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सातारा जिल्ह्यातील म्हसवड येथील सिद्धनाथाचे दर्शन घेऊन परत येत असताना पीकअप जीप विहिरीत कोसळून एकाच कुटुंबातील आठ जणांचा मृत्यू, तर सहा जण जखमी झाले आहेत. हा अपघात म्हसवड-पंढरपूर मार्गावर सोलापूर जिल्ह्याच्या माळशिरस तालुक्यातील तांदूळवाडी येथे रविवारी (ता.१४ जून) सायंकाळी पाचच्या सुमारास घडला. अपघातामधील मृत आणि जखमी हे पंढरपूर शहराजवळील इसबावी येथील रहिवासी आहेत. या घटनेमुळे इसबावीत शोककळा पसरली आहे. अपघातामधील मृत आणि जखमी हे एकाच कुटुंबातील असून एकमेकांचे नातेवाईक आहेत.



अपघातामध्ये पूजा अमोल सातोरे (वय २३ वर्षे), आरव अमोल सातोरे (वय ८ वर्षे), इंदूबाई दशरथ बावचे (वय ६० वर्षे), पूजा बालाजी बावचे (वय २७ वर्षे), अश्विनी संदीप बावचे (वय २७ वर्षे), संस्कार संदीप बावचे (वय १४ वर्षे), संस्कृती संदीप बावचे (वय १४ वर्षे), समर्थ बालाजी बावचे (वय ६ महिने, सर्व रा. इसबावी, पंढरपूर) यांचा मृत्यू झाला आहे.

सागर सावकार चौगुले (चालक, वय २५ वर्षे रा. रांजणी, ता. पंढरपूर), संदीप दशरथ बावचे (वय ३६), बालाजी दशरथ बावचे (वय ३२), जिया बालाजी बावचे (वय ४ वर्षे), आरव बालाजी बावचे (वय २ वर्षे, पाच महिने), शशिकला पोपट जाधव (वय ५०) अशी अपघातामधील जखमींची नावे आहेत. जखमींना तातडीने पंढरपूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सागर चौगुले हे बावचे यांचे नातेवाईक असून हे सर्वजण चौगुले यांच्या मालकीची पीकअप जीप घेऊन सातारा जिल्ह्यातील म्हसवड येथील सिद्धनाथाच्या दर्शनासाठी गेले होते. आज अमावस्या असल्याने हे सर्व कुटुंबीय आणि एकमेकांचे नातेवाईक हे एकाच वाहनातून देवदर्शनासाठी गेले होते.

सिद्धनाथाचे दर्शन घेऊन गावी इसबावीकडे येत असताना म्हसवड-पंढरपूर मार्गावर माळशिरस तालुक्यातील तांदूळवाडी गावालगत आल्यानंतर चालकाचे नियंत्रण सुटले आणि पीकअप जीप विहिरीत कोसळली. या अघपतात आठ जणांचा बुडून मृत्यू झाला. पीकअप वाहनातील काही लोकांनी उड्या टाकल्याने ते बचावल्याचे प्रत्यक्षदर्शिनी सांगितले.

### मृतांच्या वारसांना सरकारकडून पाच लाखांची मदत जाहीर

तांदूळवाडी येथील अपघातप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केले आहे. जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक दोघेही तातडीने घटनास्थळी रवाना झाले आहेत.स्थानिक प्रशासनाशी आम्ही सातत्याने संपर्कात आहोत. राज्य सरकारकडून मृतांच्या वारसांना 5 लाख रुपये आर्थिक मदत देण्यात येईल, अशी घोषणा केली आहे.

# पिस्तूलचा धाक दाखवून सराफ दुकानातून दागिन्यांची लूट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दुचाकीवरून आलेल्या तिघा चोरट्यांनी ७० फूट रोडवरील शिवकुमार ज्वेलर्स या सराफ दुकानात पिस्तूल व चाकूचा धाक दाखवून सोन्याचे दोन नेकलेस लुटून नेल्याची घटना शनिवारी (दि. १३) सकाळी साडेबाराच्या सुमारास घडली.

भरदिवसा झालेल्या या सशस्त्र चोरीने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ज्वेलर्सचे मालक खुर्शीद आलम शेख यांचे ७० फूट रोडवर शिवकुमार ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. शनिवारी सकाळी त्यांचा कामगार शिवकुमार भागानगरी हा दुकानातून स्वच्छता करून बाहेर गेला होता. ते एकटेच दुकानात बसले होते. दरम्यान, दुपारी साडेबाराच्या सुमारास दुचाकीवरून (एम.एच. ४५ बी.ए. ९९५१) तिघे दुकानासमोर आले. त्यातील दोघे दुकानात घुसले, एकाच्या हातात पिस्तूल,



तर दुसऱ्याच्या हातात चाकू होता. खुर्शीद यांनी चपळाईने दुकानाच्या पाठीमागच्या दरवाजातून धावत दुसऱ्या बाजूने रस्त्यावर येऊन आरडाओरड केली. तेवढ्या दहा सेकंदात एका चोरट्याने शोकेसमधील सोन्याचे दोन नेकलेस घेऊन पोबारा केला. दुकानाबाहेर दुचाकी तशीच सोडून तिघे चोरटे कुंभारी नाक्याकडे पळत सुटले. बाजूच्या बोळातून तिघेही फरार झाले.

खुर्शीद शेख यांनी तातडीने पोलिसांना पाचरण केले. सहा. पोलिस आयुक्त विजयालक्ष्मी कुर्री, सदर बझार पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्यासह पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले. खुर्शीद शेख यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चार लाख ९४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दोन नेकलेस चोरल्याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पूर्व विभाग सराफ असोसिएशनचे अध्यक्ष व्यंकटेश बिटला, सुवर्णकार फेडरेशनचे राज्य उपाध्यक्ष सिध्दाराम शिंगारे यांच्यासह सराफांनी घटनास्थळी भेट दिली. दरम्यान, या घटनेनंतर सराफ व्यापाऱ्यांना शस्त्र परवाने देण्याची मागणी व्यापाऱ्यांनी केली.

### सीसीटीव्हीमध्ये घटना कैद

चोरटे मोठी लूट करण्याच्या इराद्यानेच दुकानात आले होते. सराफ खुर्शीद हे एकटे असल्याने त्यांना पिस्तूल व चाकूचा धाक दाखवून गप्प करायचे आणि सोन्याची लूट करण्याचा त्यांची योजना असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून दिसते. चोरटे मोठी लूट करण्याच्या उद्देशानेच आल्याचे दिसून आले.

# विजयदादांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त अकलूज येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते .राज्यभरातून आलेले कार्यकर्ते, पदाधिकारी, सहकारी संस्था प्रतिनिधी तसेच दादांचा चाहता वर्ग यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या.



वाढदिवसानिमित्त शंकरनगर अकलूज येथील, शिवरत्न बंगल्यासमोर भव्य मंडप उभारण्यात आला होता. सकाळपासूनच कार्यकर्त्यांची गर्दी उसळली होती. दादांच्या निवासस्थानी पारंपरिक पद्धतीने औक्षण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी श्री अकलाई देवी मंदिरात जाऊन दर्शन घेत, राज्याच्या व जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

यावेळी कार्यकर्त्यांनी दादांना हार-तुरे न आणण्याचे आवाहन मान्य करत विविध प्रकारची झाडे भेट दिली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरला. तसेच विद्यार्थ्यांना वह्या वाटप, वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करून वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, मोहिते पाटील घराण्यातील सर्व सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, विविध शैक्षणिक संस्थांचे सदस्य, नगरसेवक तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेकांनी प्रत्यक्ष भेटून तर काहींनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.

संपूर्ण दिवस कार्यकर्ते, समर्थक आणि शुभेच्छुकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. सामाजिक उपक्रम, पर्यावरणाचा संदेश आणि जनसंपर्क यांचा संगम घडवून आणणारा हा वाढदिवस सोहळा अकलूज परिसरात चचेर्चा विषय ठरला.

## संपादकीय

# अन्नत्यागाचा आक्रोश आणि सत्तेची संवेदनशून्यता

राज्यातील शेतकरी आज अभूतपूर्व आर्थिक संकटातून जात आहे. वाढते उत्पादन खर्च, हमीभावाचा प्रश्न, अपुरी कर्जमाफी, जाचक पीकविमा योजना आणि नैसर्गिक आपत्तींचा सततचा फटका यामुळे शेतकऱ्यांची कंबर मोडली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे सुरू केलेला "अन्नत्याग" आंदोलनाचा मार्ग हा केवळ राजकीय कार्यक्रम नसून शेतकऱ्यांच्या वेदनांचा आवाज आहे.

आज आंदोलनाचा तिसरा दिवस सुरू असताना राज्यातील हजारो शेतकरी आणि विविध संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. आंदोलनाची प्रमुख मागणी अत्यंत स्पष्ट आहे. राज्यातील शेतकऱ्यांना विनाअट सरसकट कर्जमाफी द्यावी आणि जाचक अटींमुळे निष्प्रभ ठरलेली पीकविमा योजना रद्द करून पुन्हा एक रुपयात प्रभावी पीकविमा योजना लागू करावी.

लोकशाही व्यवस्थेत आंदोलन हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. विशेषतः जेव्हा शासन एखाद्या वर्गाच्या प्रश्नांबाबत उदासीन भूमिका घेत असल्याची भावना निर्माण होते, तेव्हा सत्याग्रह, उपोषण आणि अन्नत्याग यासारख्या अहिंसक मार्गाचा अवलंब केला जातो. मात्र दुर्दैवाने या आंदोलनातील मुद्द्यांवर चर्चा करण्याऐवजी काही सत्ताधारी नेते आणि प्रवक्त्यांकडून आंदोलनाची टिंगल-टवाळी केली जात असल्याचे चित्र दिसत आहे.

प्रश्न असा आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कर्जबाजारीपणा आणि शेतीतील तोट्यांबाबत गंभीर चर्चा व्हावी की आंदोलन करणाऱ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर टीका व्हावी? राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या वेदनांपेक्षा राजकीय आरोप-प्रत्यारोप अधिक महत्त्वाचे कसे ठरू शकतात?

रोहित पवार यांच्याविषयी मतभेद असू शकतात. त्यांच्या राजकारणाशी सहमत किंवा असहमत राहण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मात्र त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न हे केवळ त्यांच्या पक्षाचे नसून राज्यातील शेतकरी समाजाचे आहेत. त्यामुळे व्यक्तिवादापेक्षा मुद्द्यांवर चर्चा होणे आवश्यक आहे.

शेती आणि शेतकऱ्यांशी पवार कुटुंबाचा संबंध हा अनेक दशकांचा आहे. कृषी संशोधन, शेतकरी विकास, सहकार आणि कृषी तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांचे योगदान देशभर चर्चिले गेले आहे. त्यामुळे रोहित पवार यांनी मांडलेले प्रश्न हे अभ्यासाशिवाय किंवा केवळ राजकीय हेतूने मांडलेले आहेत, असे सहजपणे म्हणता येणार नाही. त्याऐवजी त्यांनी उपस्थित केलेल्या मागण्यांची तथ्याधारित चर्चा होणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राज्याच्या नेतृत्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे आंदोलनकर्त्यांवर टीका करणाऱ्या वक्तव्यांपेक्षा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस संवाद घडवून आणण्याची अपेक्षा जनतेची आहे. सरकारने आंदोलनकर्त्यांना चर्चेसाठी बोलवावे, त्यांच्या मागण्यांचे परीक्षण करावे आणि शक्य त्या उपाययोजना जाहीर कराव्यात.

आज राज्यातील शेतकरी कर्जमाफी, पीकविमा, हमीभाव, वीजदर, सिंचन आणि बाजारव्यवस्थेच्या प्रश्नांनी त्रस्त आहे. या प्रश्नांची उत्तरे केवळ राजकीय भाषणांतून मिळणार नाहीत. त्यासाठी संवेदनशीलता, इच्छाशक्ती आणि धोरणात्मक निर्णय आवश्यक आहेत.

लोकशाहीत विरोधी मतांचा सन्मान केला जातो. आंदोलन करणाऱ्यांची खिल्ली उडवणे हा लोकशाहीचा मार्ग नाही. शेतकऱ्यांच्या अश्रूंवर राजकारण करण्यापेक्षा त्यांच्या प्रश्नांवर उपाय शोधणे हेच कोणत्याही सरकारचे पहिले कर्तव्य असते.

पंढरपूरातील अन्नत्याग आंदोलनाने पुन्हा एकदा राज्यकर्त्यांसमोर प्रश्न उभा केला आहे. शेतकऱ्यांचा आवाज ऐकला जाणार की तो केवळ राजकीय गोंधळात दडपला जाणार?

या प्रश्नाचे उत्तर आता सरकारलाच द्यावे लागणार आहे.

# वृद्धांचा सन्मान : अत्याचारमुक्त समाजाची गरज

१५ जून हा दिवस जगभरात 'जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस वृद्ध व्यक्तींवरील वाढत्या अत्याचारांच्या समस्येकडे समाजाचे, शासनाचे आणि जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मानवी जीवनाच्या विविध टप्प्यांपैकी वृद्धत्व हा अत्यंत संवेदनशील आणि अपरिहार्य टप्पा आहे. प्रत्येक व्यक्तीला एक ना एक दिवस या अवस्थेत प्रवेश करावाच लागतो. आयुष्यभर कुटुंबासाठी, समाजासाठी आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात सन्मान, सुरक्षितता, प्रेम आणि आधार मिळणे अपेक्षित असते. परंतु बदलत्या सामाजिक संरचनेमध्ये, वाढत्या व्यक्तिकेंद्री विचारसरणीमध्ये आणि कौटुंबिक नात्यांमधील दुराव्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना विविध प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वृद्ध अत्याचार हा केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न राहिलेला नसून तो एक गंभीर सामाजिक आणि मानवी हक्कांचा प्रश्न बनला आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठांचा आदर करण्याची परंपरा प्राचीन काळापासून दिसून येते. अनेक ग्रंथांमध्ये आई-वडिलांचा सन्मान करण्याची शिकवण देण्यात आली आहे. "मातृदेवो भव, पितृदेवो भव" ही संकल्पना भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिली आहे. संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये वृद्ध व्यक्ती हे कुटुंबाचे मार्गदर्शक, निर्णयकर्ते आणि अनुभवांचे भांडार मानले जात होते. त्यांच्या अनुभवाचा उपयोग पुढील पिढ्यांच्या घडणीत होत असे. परंतु कालांतराने औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणासाठी व रोजगारासाठी होणारे स्थलांतर, अणुकुटुंबपद्धतीचा वाढता प्रभाव आणि बदलती जीवनशैली यांमुळे ज्येष्ठ नागरिकांचे स्थान बदलू लागले. अनेक वृद्ध व्यक्तींना एकाकीपणा, दुर्लक्ष आणि भावनिक असुरक्षिततेचा सामना करावा लागतो.

वृद्ध अत्याचार ही संकल्पना व्यापक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, विश्वासाच्या नात्यामध्ये वृद्ध व्यक्तीवर होणारी कोणतीही कृती किंवा दुर्लक्ष ज्यामुळे त्या व्यक्तीला हानी, दुःख किंवा त्रास सहन करावा लागतो, त्याला वृद्ध अत्याचार असे म्हणतात. हा अत्याचार शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक किंवा सामाजिक स्वरूपाचा असू शकतो. अनेकदा अत्याचार करणारी व्यक्ती ही वृद्ध व्यक्तीची स्वतःची मुले, नातेवाईक, काळजीवाहक किंवा इतर परिचित व्यक्ती असते. त्यामुळे या प्रकारच्या अत्याचाराची तीव्रता अधिक वाढते.

शारीरिक अत्याचारामध्ये वृद्धांना मारहाण करणे, त्यांना जबरदस्तीने ढकलणे, त्यांच्या हालचालींवर बंधने घालणे किंवा आवश्यक वैद्यकीय उपचारांपासून वंचित ठेवणे यांचा समावेश होतो. वृद्ध व्यक्तींची शारीरिक क्षमता कमी झालेली असल्यामुळे अशा प्रकारच्या अत्याचारांचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. मानसिक किंवा भावनिक अत्याचारामध्ये सतत अपमान करणे, त्यांची टिंगल करणे, धमकावणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांना कुटुंबातील निर्णयांपासून दूर ठेवणे यांचा समावेश होतो. यामुळे वृद्ध व्यक्तींमध्ये नैराश्य, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होतो.

आर्थिक अत्याचार हा आजच्या काळात वृद्धांवरील अत्याचाराचा अत्यंत गंभीर प्रकार ठरत आहे. वृद्ध व्यक्तींच्या संपत्तीवर बळजबरीने ताबा मिळविणे, त्यांच्या पेन्शन किंवा बचतीचा गैरवापर करणे, फसवणूक करून कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेणे किंवा त्यांच्या आर्थिक निर्णयांवर नियंत्रण ठेवणे यांसारख्या घटना वाढताना दिसत आहेत. अनेक वृद्ध व्यक्ती आर्थिकदृष्ट्या आपल्या कुटुंबीयांवर अवलंबून असल्यामुळे किंवा भावनिक कारणांमुळे अशा अत्याचाराविरोधात आवाज उठवत नाहीत.

दुर्लक्ष हा वृद्ध अत्याचाराचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार आहे. वृद्ध व्यक्तींना वेळेवर अन्न न देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी न घेणे, औषधोपचार टाळणे किंवा त्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करणे यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. काही वेळा वृद्ध व्यक्तींना कुटुंबामध्ये पूर्णपणे एकटे पाडले जाते, त्यांच्याशी संवाद साधला जात नाही किंवा त्यांना ओझे समजले जाते. हे दुर्लक्षही अत्याचाराचेच एक रूप आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिनाची संकल्पना वृद्ध व्यक्तींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर उदयास आली. संयुक्त राष्ट्रसंघाने वृद्ध व्यक्तींच्या हक्कांच्या संरक्षणाला प्राधान्य देत या विषयाकडे जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न सुरू केले. या दिवसाचा उद्देश वृद्ध अत्याचाराविषयी जनजागृती निर्माण करणे, अत्याचाराची कारणे आणि परिणाम समजून घेणे तसेच त्याच्या प्रतिबंधासाठी सामूहिक कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे.

भारतामध्ये वृद्धांची संख्या सातत्याने वाढत आहे. आरोग्य सुविधांमध्ये झालेली सुधारणा आणि वाढलेले आयुर्मान यांमुळे वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. लोकसंख्येतील या बदलामुळे वृद्धांच्या गरजा, समस्या आणि हक्क यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरले आहे. आर्थिक सुरक्षितता, आरोग्य सेवा, सामाजिक संरक्षण आणि भावनिक आधार या वृद्धांच्या मूलभूत गरजा आहेत. परंतु अनेक वृद्ध व्यक्तींना या गरजांची पूर्तता होत नसल्याचे दिसून येते.

वृद्ध अत्याचारामागील कारणांचा विचार केला असता अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक घटक समोर येतात. आर्थिक अवलंबित्व हे त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे. अनेक वृद्ध व्यक्ती निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. काही वेळा संपत्तीच्या वादांमुळे किंवा आर्थिक स्वार्थापोटी त्यांच्यावर अत्याचार केले जातात. व्यसनाधीनता, बेरोजगारी, कौटुंबिक तणाव आणि काळजीवाहकांवर येणारा मानसिक ताण यांमुळेही वृद्ध अत्याचाराची शक्यता वाढते.

अत्याचाराचे परिणाम वृद्ध व्यक्तींच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचे असतात. सततचा मानसिक ताण, अपमान आणि दुर्लक्ष यांमुळे त्यांच्यामध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. शारीरिक अत्याचारामुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्या अधिक गंभीर होऊ शकतात. काही वृद्ध व्यक्ती अत्याचार सहन करण्यास कंटाळून सामाजिक जीवनापासून दूर जातात. अत्यंत गंभीर परिस्थितीत आत्महत्येचे विचारही त्यांच्या मनात येऊ शकतात.

वृद्ध महिलांची परिस्थिती विशेषतः अधिक संवेदनशील असते. विधवापण, आर्थिक परावलंबित्व, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना अधिक असुरक्षित परिस्थितीचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या वृद्ध महिलांना आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव अधिक तीव्रतेने जाणवतो. त्यामुळे वृद्ध महिलांसाठी विशेष धोरणे आणि संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज आहे.

भारतात वृद्धांच्या संरक्षणासाठी विविध कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पालक आणि वरिष्ठ नागरिक यांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम, २००७' हा कायदा त्यांपैकी महत्त्वाचा आहे. या कायद्याअंतर्गत मुलांना आणि वारसदारांना वृद्ध पालकांच्या देखभालीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. वृद्ध व्यक्तींना त्यांच्या पालनपोषणासाठी न्यायाधिकरणामार्फत आर्थिक सहाय्य मिळविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याशिवाय, वृद्धांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठीही विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत.

केंद्र आणि राज्य शासनाकडून वृद्धांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, आरोग्यविषयक सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सवलती, हेल्पलाइन सेवा आणि वृद्धाश्रमांच्या माध्यमातून वृद्धांना आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याविषयी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.

स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही वृद्धांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. वृद्धांसाठी समुपदेशन सेवा, आरोग्य तपासणी शिबिरे, कायदेशीर मदत आणि सामाजिक सहभागाचे कार्यक्रम आयोजित करून त्यांना मानसिक आणि सामाजिक आधार दिला जातो. अशा संस्थांच्या कार्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना नव्याने जगण्याची प्रेरणा मिळते.

कुटुंब ही वृद्धांच्या संरक्षणाची सर्वात महत्त्वाची संस्था आहे. वृद्धांना प्रेम, सन्मान आणि भावनिक आधार देणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. त्यांच्यासोबत संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. वृद्धांना ओझे समजण्याऐवजी त्यांना कुटुंबाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

शैक्षणिक संस्थांमध्ये मूल्यशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठांविषयी आदरभाव निर्माण करणे आवश्यक आहे. पिढ्यांमधील संवाद वाढविणारे उपक्रम राबविल्यास तरुण पिढीला वृद्धांच्या अनुभवांचे महत्त्व समजून घेता येईल. माध्यमांनीही वृद्धांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने हाताळत सकारात्मक जनजागृती घडवून आणणे आवश्यक आहे.

डिजिटल युगात वृद्ध व्यक्तींना तंत्रज्ञानाची माहिती करून देणेही महत्त्वाचे ठरते. ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी डिजिटल साक्षरता आवश्यक आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने दूर राहणाऱ्या कुटुंबीयांशी संपर्क साधणे आणि सामाजिक संबंध टिकवून ठेवणे शक्य होते.

वृद्धत्व हा जीवनाचा नैसर्गिक टप्पा आहे. आजचे वृद्ध हे कालचे समाजनिर्माते, कुटुंबाचे आधारस्तंभ आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे नागरिक आहेत. त्यांच्या कष्टामुळे आणि त्यागामुळे अनेक पिढ्या घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे नैतिक कर्तव्य आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन हा आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरातील वृद्ध व्यक्तींशी कसे वागतो, त्यांच्या गरजांकडे किंतपत लक्ष देतो आणि त्यांना किंतपत सन्मान देतो याचा विचार करण्याची गरज आहे. वृद्धांचा सन्मान ही केवळ औपचारिकता नसून ती आपल्या संस्कृतीची आणि मानवतेची खरी ओळख आहे.

समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकासाच्या निकषांवर करता येत नाही. तो समाज आपल्या दुर्बल आणि ज्येष्ठ घटकांशी कसा वागतो यावरही त्याचे मूल्यमापन केले जाते. वृद्ध व्यक्तींचा सन्मान करणारा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि त्यांना सुरक्षित व आनंदी जीवन जगण्याची संधी देणारा समाजच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आणि प्रगत ठरतो.

१५ जूनच्या निमित्ताने आपण सर्वांनी वृद्ध अत्याचाराला ठामपणे नकार देण्याचा संकल्प केला पाहिजे. शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे, शैक्षणिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांनी एकत्रितपणे कार्य करून वृद्धांसाठी अत्याचारमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविणे आणि त्यांच्या जीवनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हीच या दिनाची खरी सार्थकता ठरेल.

आज आपण वृद्धांचा सन्मान करू, त्यांच्या हक्कांचे रक्षण करू आणि त्यांना प्रेमाने साथ देऊ, तर उद्याच्या आपल्या वृद्धत्वालाही सन्मानाची हमी मिळेल. त्यामुळे ह्यवृद्धांचा आदर - अत्याचाराला नकारह्न हा संदेश प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. वृद्धांचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान आणि अत्याचारमुक्त वृद्धत्व हीच सभ्य समाजाची खरी ओळख आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# नातेपुते पोलिसांची वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

## ५४,४०० रुपयांचा दंड वसूल

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते शहर आणि परिसरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आणि रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी नातेपुते पोलिसांच्या वतीने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध धडक मोहीम राबवण्यात आली आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत पोलिसांनी विविध कलमांखाली एकूण ७८ केसेस दाखल करून ५४,४०० रुपये इतका दंड वसूल केला आहे.सध्या नातेपुते पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहनचालकांकडून वाहतूक नियमांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होत असल्याचे दिसून येत होते. याला शिस्त लावण्यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. या कारवाईत प्रामुख्याने खालील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कडक कारवाई करण्यात आली.

नो पार्किंग बाजारपेठ आणि मुख्य रस्त्यांवर अस्ताव्यस्त वाहने लावून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.ड्रिंक अँड ड्राईव्ह मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवून स्वतःच्या आणि इतरांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या तळीरामांना पोलिसांनी चांगलाच हिसका दाखवला. ट्रिपल सीट दुचाकीवर क्षमतेपेक्षा जास्त म्हणजेच तीन सीट प्रवास करणाऱ्या हुल्लडबाज तरुणांवर कडक कारवाई करण्यात आली.फॅन्सी नंबर प्लेट नंबर प्लेटवर फॅन्सी अक्षरे, नावे किंवा नियमानुसार नसलेले नंबर टाकून फिरणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करत नंबर प्लेट बदलण्याच्या सूचना देण्यात आल्या.

मोबाईल टॉकिंग वाहन चालवताना मोबाईलवर बोलून लक्ष विचलित करणाऱ्या आणि अपघाताला निमंत्रण देणाऱ्या चालकांवरही पोलिसांनीकारवाईचा बडगा उगारला आसुन सदर कारवाई मा.उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर तसेच पोलीस कॉन्स्टेबल सुधीर हंगे व रमेश बोराटे यांनी केली आहे. सर्व नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे. यापुढेही नो पार्किंगमध्ये वाहने उभी करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे आवाहन नातेपुते पोलीस ठाण्याकडून करण्यात आले आहे.

# कन्हेरगावच्या वाड्या-वस्तीवरील वीजप्रश्नावर आमरण उपोषणाचा इशारा

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** कन्हेरगाव (ता. माढा) येथील वाड्या-वस्तीवरील सिंगल फेज वीजपुरवठा मागील दोन महिन्यांपासून रात्रीच्या वेळेत बंद ठेवण्यात येत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या प्रश्नाकडे महावितरण प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून टेंभुर्णी येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे यांनी दिला आहे.

याबाबतचे निवेदन टेंभुर्णी येथील महावितरणचे उपअभियंता महेश पवार यांना देण्यात आले आहे. यावेळी कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, संजय उर्फ दादासाहेब डोके पाटील, किशोर मोरे उपस्थित होते.



निवेदनात म्हटले आहे की, कन्हेरगाव येथील वाड्या-वस्तीवरील सिंगल फेज वीजपुरवठा दररोज सायंकाळी ६ ते सकाळी ८ वाजेपर्यंत खंडित ठेवला जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर, पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर परिणाम होत आहे.

वारंवार तक्रारी करूनही या समस्येचे निराकरण करण्यात आलेले नसल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे वीजपुरवठा तात्काळ नियमित करण्याची मागणी करण्यात आली असून, मागणी मान्य न झाल्यास १५ जूनपासून आमरण उपोषण सुरू करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या आंदोलनाला परिसरातील ग्रामस्थांचा पाठिंबा असून, महावितरण प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# शेअर बाजारातील कोट्यवधींच्या तोट्याने उद्ध्वस्त झाले कुटुंब

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील हत्तीज येथे घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर हादरला आहे. नंदुरबार जिल्ह्यातील चौगाव (बु.) ता. तळोदा येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेले योगेश बाळासाहेब पाटील यांनी पत्नी आणि दोन मुलांना विष देऊन स्वतः गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

मृतांमध्ये माधुरी योगेश पाटील (वय ३७), अथर्व पाटील (वय ११) आणि शिवांश पाटील (वय ९) यांचा समावेश आहे. गुरुवारी रात्री ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

शुक्रवारी सकाळी दूध देण्यासाठी आलेल्या व्यक्तीला घरातून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. संशय आल्याने दरवाजा तोडण्यात आला असता घरातील भीषण वास्तव समोर आले. योगेश पाटील यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला, तर



पत्नी व दोन मुले मृतावस्थेत होती.

तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, योगेश पाटील यांना शेअर बाजारातील व्यवहारांमध्ये सुमारे एक कोटी ऐंशी लाख रुपयांचा तोटा झाला होता. काही दिवसांपूर्वी आईकडून मिळालेले सुमारे एक कोटी रुपयेही त्यांनी पुन्हा शेअर बाजारात गुंतवले होते. मात्र त्यामध्येही नुकसान झाल्याने ते मानसिक तणावाखाली होते. याशिवाय मित्र व नातेवाईकांकडूनही त्यांनी मोठ्या प्रमाणात हातउसने पैसे घेतल्याची माहिती समोर येत आहे.

घटनेपूर्वी त्यांनी तब्बल २२ पानी सुसाईड नोट लिहून ठेवली होती. या नोटमध्ये आर्थिक व्यवहार, कर्जे आणि मालमत्तेबाबतच्या इच्छांचा उल्लेख करण्यात आल्याचे समजते. विशेष म्हणजे या पत्रात कोणालाही जबाबदार धरलेले नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव आणि पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. चारही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले असून या प्रकरणी मयत योगेश पाटील यांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

एका सुशिक्षित कुटुंबाचा अशा प्रकारे झालेला अंत संपूर्ण बार्शी तालुक्याला हादरवून गेला असून हत्तीज गावावर शोककळा पसरली आहे.

# लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष सरकाळे, प्रा . सायली बडेकर ,प्रा. वर्षा मानेदेशमुख हे उपस्थित होते. महाविद्यालयाचे विद्यार्थी श्रीकांत ढेरे व रुद्राक्ष साखरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विविध युद्धप्रसंग व महाराजांनी या युद्धात दाखविलेले बुद्धिचातुर्य व संयम याविषयी मनोगत व्यक्त केले. प्रा. आशिष सरकाळे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनप्रवास, कार्य यांविषयी सांगताना त्यांच्याकडून आपण




उत्तम नियोजन, दूरदृष्टी, नम्रपणा, समाजाप्रती त्याग या गोष्टी अंगीकारल्या पाहिजेत असे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिका यादव यांनी व आभार साक्षी झगडे यांनी व्यक्त केले.

# पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत जिल्ह्यातील खाजगी सोनोग्राफी सेंटरला अचानक भेटी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पीसीपीएनडीटी (Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques) कायद्यांतर्गत राज्य पर्यवेक्षीय मंडळाची महत्त्वपूर्ण बैठक आरोग्य भवन, आरोग्य सेवा आयुक्तालय येथे दि. 27 मे 2026 रोजी पार पडली.

सदर बैठकीमध्ये माननीय आरोग्य मंत्री यांनी दिलेल्या सूचनेनुसार राज्यस्तरीय अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील नोंदणीकृत खाजगी सोनोग्राफी सेंटरला अचानक भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी संबंधित सेंटरमधील रुग्ण नोंदी,ऑनलाईन एफ फॉर्म, कायद्याचे पालन, आवश्यक कागदपत्रे तसेच सोनोग्राफी सेंटर मधील विविध बाबींची तपासणी करण्यात आली. पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, लिंग निवड प्रतिबंध आणि गर्भलिंग निदानास आळा घालण्याच्या उद्देशाने अशा भेटी व तपासण्या नियमितपणे घेण्यात येत असल्याचे डॉ. दिगंबर कानगुले- उपसंचालक (वि. ल.टो), राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यामध्ये नोंदणीकृत सोनोग्राफी सेंटर कायद्याचे उल्लंघन करत असल्यास किंवा अनाधिकृतपणे कोणी गर्भलिंग निदान करत असल्यास नागरिकांनी www.amchimulgimaha.in या संकेतस्थळावर तसेच हेल्पलाईन क्रमांक 1800-233-4475 व 104 वर तक्रार करण्याचे आवाहन जिल्हा शल्य चकित्स्क डॉ वर्षा डोईफोडे यांनी केले आहे. सदर भेटीदरम्यान जिल्हास्तरीय अधिकारी व सोनोग्राफी सेंटर चे डॉक्टर उपस्थित होते.

## वात्रटिका

### सूत्रांकडून....

तत्पर असतात सूत्र
म्हणून बातम्या मिळतात...
सूत्रांकडून मिळालेल्या
माहितीने गोष्टी कळतात...
कोणीही पोहचत नाही
तिथे सूत्र पोहचतात...
सूत्रांचे पटते ज्यांना ते तर
घुंगरू बांधून नाचतात...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# विधान परिषद निवडणूक 2026 च्या मतदानाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी प्रशिक्षण संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक 2026 च्या मतदानाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी येथील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे तसेच सर्व संबंधित तहसीलदार अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे यांनी प्रशिक्षणासाठी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे स्वागत केले. निवडणुकीसाठी मतदानाचे सहा केंद्र असून दोन उमेदवार आहेत. या निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण 616 मतदार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

निवडणूक जाहीर व आचारसंहिता दिनांक 18 मे 2026 रोजी लागू होणार असून मतदान दिनांक 18 जून 2026 रोजी सकाळी 8 ते दुपारी 4 या वेळेत होईल. मतमोजणी 22 जून 2026 रोजी करण्यात येणार आहे.

मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदारांची यादी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरविली जाईल. संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या मतदान केंद्रावर ज्या मतदारांची यादी प्राप्त झाली आहे, त्या यादीची प्रथम खात्री करून घ्यावी. नगरपंचायत व नगरपरिषद केंद्रांमध्ये मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदारांना ओळखण्यासाठी बीडिओ–सीईओ व संबंधित अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या.

मतदान अधिकारी/कर्मचारी नियुक्तीमध्ये क्षेत्रीय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष म्हणून तहसीलदार, मतदान अधिकारी क्र. 1 म्हणून नायव तहसिलदार, मतदान अधिकारी क्र. 2 म्हणून अव्वल कारकून, मतदान अधिकारी क्र. 3 म्हणून अव्वल कारकून/लिपिक आणि मतदान कर्मचारी म्हणून 1 शिपाई यांचा समावेश करण्यात आला आहे. मतदारांची ओळख पटविण्यासाठी स्थानिक स्वराज संस्थेचे मुख्याधिकारी व गटविकास अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली असल्याचे सांगण्यात आले.

प्रशिक्षणात मतदानपद्धतीसह मतपत्रिकेच्या नियमांची सविस्तर माहिती देण्यात आली. स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीमध्ये मतदारांनी मतपत्रिकेवर उमेदवाराच्या



नावासमोर पसंतीक्रम देणे आवश्यक आहे. पसंतीक्रम हा अंकात 1 पासून लिहायचा असून तो मराठी, इंग्रजी, रोमन किंवा भारतीय घटनेतील आठव्या अनुसूचीतील कोणत्याही भारतीय भाषेतील अंकात लिहिण्यास मुभा आहे, मात्र शब्दात लिहिता येणार नाही. भारत निवडणूक आयोगाने पुरविलेला जांभळा स्केचपेन वापरणे बंधनकारक आहे. एकाच उमेदवाराला किंवा एकापेक्षा अधिक उमेदवारांना एकसारखा पसंतीक्रम देता येणार नाही, तसेच पसंतीक्रमांव्यतिरिक्त इतर कोणताही मजकूर लिहू नये, असेही स्पष्ट करण्यात आले.

खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैध ठरणार असल्याचेही सांगण्यात आलेः ज्यावर 1 हा अंक नमूद केलेला नसेल; एकापेक्षा जास्त उमेदवारांच्या नावांसमोर 1 दिला असेल; 1 असा लिहिलेला असेल की तो कोणत्या उमेदवारासाठी आहे याबाबत शंका निर्माण होईल; एका उमेदवाराच्या नावासमोर 1 आणि त्यासोबत इतर अंक (2, 3 इत्यादी) नमूद असतील; मतपत्रिकेवर अशी खूण किंवा लिखाण असेल ज्यावरून मतदाराची ओळख पटू शकते; किंवा जांभळ्या स्केचपेनशिवाय अन्य कशाने अंक नमूद केलेला असेल.

मतपत्रिकेबाबत माहिती देताना मतपत्रिका इंग्रजी व मराठी भाषेत असून रंग गुलाबी असल्याचे सांगण्यात आले. प्रत्येक मतपत्रिकेला काउंटर फाईल असून त्यावरील नोंदींमध्ये मतदार यादी भाग क्रमांक, मतदारांचा अनुक्रमांक आणि मतदाराची स्वाक्षरी/अंगठा यांचा समावेश आहे. मतदान केंद्रावरील पथकाने मतपत्रिका तपासून नाव व्यवस्थित छापले आहे की नाही, मतदार संख्या व मतपत्रिका किती आहेत याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले.

निवडणूक साहित्य ताब्यात घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या. दिनांक 17/06/2026 रोजी सकाळी 9.00 वा. नियोजन भवन सोलापूर येथे साहित्य वितरण होणार असून साहित्य वितरण केंद्रावर वेळेवर उपस्थित राहून साहित्य ताब्यात घ्यावे. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय सोडण्यापूर्वी तसेच मतदान केंद्रावर पोहोचल्यानंतर साहित्याची खात्री पुन्हा–पुन्हा करावी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे अहवाल द्यावा, असे सांगण्यात आले.

महत्त्वाच्या साहित्याची तपासणी मतदान केंद्राध्यक्षांनी स्वतः करून घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये मतपेटी, मतपत्रिका, जांभळ्या शाईचा स्केचपेन, हिरवे पेपर सील व ॲड्रेस टॅग, संविधानिक/असंविधानिक नमुने व लिफाफे, मतदान केंद्राध्यक्षांची दैनंदिनी/घोपणापत्र, मतदार यादीच्या चिन्हांकित प्रती, पक्क्या शाईचा पेन/शाईची बाटली, विभेदक चिन्ह असलेला रबरी शिक्का, तसेच उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधी यांच्या नमुना स्वाक्षरीची प्रत यांचा समावेश असल्याचे प्रशिक्षणात नमूद करण्यात आले. सिलींग साहित्य म्हणून पितळी सिल व लाख, ढकलपट्टी, इशारा फलक यांचाही उल्लेख करण्यात आला.

मतदार यादीबाबतही प्रशिक्षणात मार्गदर्शन करण्यात आले. आपल्याच मतदान केंद्राची मतदार यादी प्राप्त झाल्याची खात्री करणे, मतदार संख्या पडताळणे, सर्व पृष्ठे आहेत का, अनुक्रमांक सलग आहेत का, तसेच मतदार यादीच्या इंग्रजी 2 व मराठी 2 प्रती प्राप्त झाल्या आहेत का, याची तपासणी करावी, असे सांगण्यात आले.

मतदान केंद्रावर पोहोचल्यानंतर मतदान केंद्र आदेशातील ठिकाण, इमारत व खोली निश्चित ठिकाणी असल्याची खात्री करावी. पुरेसे फर्निचर व दिवाबत्ती उपलब्ध आहे का, याचीही तपासणी करावी. मतदान केंद्राच्या ठिकाणी राजकीय नेते/पक्षचिन्हे वगैरे फोटो किंवा पक्षाशी साधर्म्य असलेली चित्रे असल्यास ती झाकून ठेवणे किंवा फोटो उलटे करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. मतदान केंद्राच्या बाहेर मतदान केंद्र व त्या ठिकाणी मतदान करणाऱ्या मतदारांचा तपशील दर्शविणारी नोटीस लावण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

मतदान प्रतिनिधींना नेमणूक पत्र (नमुना 10) घेऊन येण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रतिनिधींची ओळख त्यांच्या नेमणूक पत्रातील उमेदवार निवडणूक प्रतिनिधी यांच्या सहीची खात्री निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पुरविलेल्या सहीच्या नमुन्यावरून करून करणे आवश्यक आहे. प्रतिनिधी हा त्या विधानपरिषद मतदारातील असणे बंधनकारक असल्याचेही सांगण्यात आले. एका उमेदवाराला एका मतदान केंद्रावर जास्तीत जास्त तीन प्रतिनिधींची नेमणूक करता येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

मतदान गुप्त राहण्यासाठी 100 मीटर परिसरात सुरक्षा यंत्रणा राबवावी. सर्व मतदान पथकाने मतदान केंद्रावर वेळेच्या तीस मिनिटे अगोदर उपस्थित राहून गोपनीयतेची शपथ घ्यावी. गोपनीयतेचा अभंग केल्यास शिक्षा होऊ शकते, तसेच मतदान केंद्राच्या परिसरात फोटो काढण्यावर बंदी असल्याचे सांगण्यात आले. मतपेटीमध्ये मतपत्रिका टाकली जाते की नाही याची खात्री करणेही बंधनकारक ठरणार आहे. मतदान केंद्रात कोणत्याही मतदाराला मोबाईल/स्मार्टवॉचसारखी उपकरणे घेऊन जाता कामा नये. मतदान झाल्यानंतर मतपत्रिका कोणालाही दाखवू नये; दाखवल्यास मतपत्रिका रद्द होण्याची प्रक्रिया असल्याचे प्रशिक्षणात सांगण्यात आले. मतपत्रिकेचा नंबर गोपनीय ठेवून स्थळ प्रतीवर मतदारांची सही, अनुक्रमांक लिहिणे व त्यात अधोरेखित/टिक करणे आवश्यक असल्याचेही निर्देश देण्यात आले.

मतपेटी गोदरेज कंपनीची असून ती उघडणे, सील बंद करणे यासंदभार्तील प्रशिक्षण होणार असल्याचे सांगण्यात आले. त्या मतपेटीवर ॲड्रेस टॅगवर मतदान केंद्राचे नाव, अनुक्रमांक, पत्ता व दिनांक अचूक लिहिण्याच्या सूचना देण्यात आल्या.

मतदान 4 वाजता संपण्याच्या वेळी गेट बंद करणे आवश्यक असून मतदान केंद्रातील उमेदवारांचे मतदान होईपर्यंत मतपेटी बंद करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले. 4 वाजल्यानंतरही रांगेत असलेल्या मतदारांचे मतदान पूर्ण होईपर्यंत मतपेटी बंद न करण्याचे निर्देश देण्यात आले. संपूर्ण मतदान झाल्यानंतर मतपेटी व मतदानाचे साहित्य कापडामध्ये बांधून सील करून नियोजन भवन येथे पोलीस पथकासह परत करणे अपेक्षित असल्याचे प्रशिक्षणात नमूद करण्यात आले.

उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख यांनी सर्व उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले.

# बालहक्क जनजागृतीसाठी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्या हस्ते स्वाक्षरी मोहीमेचा शुभारंभ

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):–** जागतिक बालहक्क कामगार विरोधी दिनानिमित्त कामगार विभागाच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्या हस्ते या स्वाक्षरी मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात कामगार विभागाच्या वतीने लावण्यात आलेल्या बालहक्क कामगार विरोधी दिनाच्या फलकाचे फीत कापून उद्घाटनही



त्यांच्या हस्ते झाले.

सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले, सरकारी कामगार आधीकारी एस. बी. डोबरीयल, जिल्हा माहिला बाल विकास अधिकारी अविनाश मगर, धनाजी शिगाडे, लि. ट. प्रदीप पखमोडे, बाळासाहेब ठाकूर, राजेश्वर जाधव, गजानन मुंढे आदी उपस्थित होते.

यावेळी कामगार विभागाच्या वतीने या मोहिमेद्वारे नागरिकांना बालमजुरी निर्मूलनासाठी बांधिलकी दर्शविण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी पोस्टरवर स्वाक्षरी करून बालमजुरी विरोधी लढ्यात सहभाग नोंदवला.

बालमजुरी ही सामाजिक समस्या असून तिचे निर्मूलन करण्यासाठी प्रशासनाबरोबरच समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी व्यक्त केले. शिक्षण हीच खरी ताकद असून प्रत्येक बालकाला दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# ॲट्रॉसिटी अंतर्गत खून प्रकरणातील वारस शोध मोहीम

## 15 दिवसांत कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक 20 नोव्हेंबर 2025 अन्वये ॲट्रॉसिटी अधिनियमांतर्गत खून व मृत्यू झालेल्या पीडितांच्या वारसांना शासकीय नोकरी देण्याची कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणांवर कार्यवाही करण्यात येत आहे.

दिवंगत दत्ता लक्ष्मण खंदारे यांचा खून झाल्याने अक्कलकोट एमआयडीसी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक 926/2020 अन्वये नोंद करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याची नोंद अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत करण्यात आलेली आहे. या प्रकरणी पात्र वारसदारांचा शोध घेण्यात येत आहे; मात्र चौकशीनुसार वारसदारांची माहिती प्राप्त झालेली नाही.

त्यामुळे दिवंगत दत्ता लक्ष्मण खंदारे यांची पत्नी, अपत्य वा अन्य कायदेशीर वारसदार असल्यास त्यांनी या जाहीर प्रकटनाच्या प्रसिध्दीपासून 15 दिवसांच्या आत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तिसरा मजला, सात रस्ता, सोलापूर या कार्यालयास संपर्क साधून आपले वारसत्व सिद्ध करणारी कागदपत्रे सादर करावीत. यात वारस प्रमाणपत्र, आधार कार्ड, जन्म दाखला, रेशन कार्ड तसेच इतर संबंधित पुरावे यांचा समावेश असावा.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत, दावा अथवा वारसत्वाबाबतची माहिती प्राप्त न झाल्यास उपलब्ध अभिलेखांच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्याबाबत नंतर करण्यात येणारे कोणतेही दावे किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, अशी माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे.

# कन्यादान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत सामुदायिक विवाह सोहळयामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील नव विवाहित दांपत्यासाठी वित्तीय सहाय्य अंतर्गत सोलापूर जिल्हयातील सामुहीक विवाह सोहळयामध्ये विवाह केलेल्या दांपत्याना तसेच विवाह संपन्न केलेल्या संस्थेस कन्यादान योजनेतंर्गत शासन निर्णय दि.2 फेब्रुवारी 2019 मधील अटी व शर्तीनुसार तसेच शासन निर्णय 18 जुलै 2024 मधील वाढीव अनुदान रक्कम रुपये 25,000/–डिबीटी पध्दतीने लाभार्थ्यांच्या खात्यावर अदा करण्यात येते. तसेच सामुदायिक विवाह सोहळा संपन्न करण्यात आलेल्या स्वयंसेवी संस्थेस प्रोत्साहनात्मक अनुदान म्हणून प्रति दांपत्य रक्कम रुपये 4000/– इतके अदा करण्यात येते.

सदर योजनेबद्दलचे निकष हे 2 फेब्रुवारी 2019 च्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ, ब, क, ड नुसार असतील प्रस्तावाचा नमुना हमीपत्र व प्रतिज्ञापत्र इत्यादी बाबीकरीता खालील नमुद पत्यावर कार्यालयास संपर्क साधावा. पत्ता – सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय चौथा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सात रस्ता सोलापूर. अशी माहिती सहायक संचालक इ.मा.बहुजन कल्याण, गणेश सोनटक्के यांनी दिली आहे.

# सोलापूर विमानतळावर 'प्रवासी सुविधा दिवस 2026' साजरा करण्यात येणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** प्रवाशांचा प्रवास अनुभव अधिक चांगला करण्यासाठी, सामुदायिक सहभाग वाढविण्यासाठी तसेच विमानतळावरील विविध प्रवासी–अनुकूल सुविधांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने सोलापूर विमानतळावर प्रवासी सुविधा दिवस साजरा करण्यात येणार आहे.

या निमित्ताने सोलापूर विमानतळावर आगमन व प्रस्थान करणाऱ्या प्रवाशांचे तिलक लावून व मिठाई वाटप करून स्वागत करण्यात येईल. कार्यक्रमादरम्यान दिवसभर नियमित अंतराने वंदे मातरम् चे गायन करण्यात येईल. कार्यवाहक विमानतळ संचालक सौ. अंजनी कुमारी यांनी माध्यमांना सांगितले की, उत्सव कालावधीत सोलापूर विमानतळावर विविध सांस्कृतिक व लोककला सादरीकरणांसह अनेक प्रवासी–केंद्रित उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उत्सवांतर्गत वृक्षारोपण मोहीम, सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय मुलांसाठी चित्रकला स्पर्धा तसेच शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भेटी आयोजित करण्यात येतील, ज्यामुळे त्यांना विमान वाहतूक क्षेत्र व विमानतळ संचालनाची माहिती मिळेल.

समर्पित सेवांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हाऊसकीपिंग कर्मचारी, एअरलाईन कर्मचारी, राज्य पोलीस कर्मचारी तसेच भारतीय विमानतळ प्राधिकरण (अअक) कर्मचारी यांचा सत्कार करण्यात येईल. उत्कृष्ट कार्य करणारे विमानतळ कर्मचारी व भागधारक यांचाही प्रवासी सेवा व कार्यक्षम संचालनातील योगदानासाठी गौरव करण्यात येईल.

यशोधरा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, सोलापूर यांच्या सहकार्याने प्रवासी, विमानतळ कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोफत आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात येईल. तसेच स्थानिक ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तदान शिबिर देखील आयोजित करण्यात येणार आहे.

इतर आकर्षणांमध्ये स्वतंत्र सेल्फी पॉईंट, प्रवासी संवाद व अभिप्राय सत्र, विमानतळावरील सुविधा व सेवांविषयी जनजागृती मोहीम तसेच सोलापूर विमानतळावर उपलब्ध विविध सुविधांची माहिती समाविष्ट असेल. प्रवासी सुविधा दिवस हा सोलापूर विमानतळाच्या प्रवासी समाधान, सामुदायिक सहभाग, पर्यावरणीय जबाबदारी आणि सेवा उत्कृष्टतेप्रती असलेल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर–वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु–वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | ५ | ६ | ■ | ७ | | ८ |
| | ■ | ९ | | ■ | १० | | | ■ | | ■ | |
| ११ | १२ | | ■ | १३ | | ■ | १४ | १५ | ■ | १६ | |
| १७ | | ■ | १८ | | ■ | १९ | ■ | २० | | | |
| २१ | | | ■ | २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |
| | ■ | ■ | २५ | | ■ | २६ | | | २७ | ■ | |
| ■ | २८ | ■ | २९ | | ■ | | ■ | ३० | | ३१ | ■ |
| ३२ | | ३३ | | ■ | ३४ | | ३५ | ■ | ३६ | | ३७ |
| | ■ | ३८ | | ३९ | | ■ | | ■ | ■ | ४० | |
| ४१ | | | ■ | ४२ | | ४३ | ■ | ४४ | | ■ | |
| ■ | ■ | ४५ | ४६ | ■ | ४७ | | ■ | | ■ | ४८ | |
| ■ | ४९ | | | ■ | | ■ | ५० | | | | ■ |

**उभे शब्द :** १) लगेच उत्तर देणारा, वेळ न दवडता उत्तर देणारा २) धनी ३) सन उलट लिहा ४) सर्कशीतील विदूषक, पत्त्यातील एक पान ५) अंगावरील छोटा काळा ठिपका ६) पावा, मुरली ७) दुर्ग, किल्ला ८) महाराष्ट्रातील एक देशपातळीवरील नेते १२) लोकांचा समूह १३) हाताच्या चपळतेने फसविणे, ***** करणे १५) मोठे, उज्वल असे यश १६) एक रास २३) कमा उलट लिहा २५) राज्याचे माजी मुख्यमंत्री, सध्या केंद्रीय मंत्री–**** राणे २६) टीव्ही सिरीयल निर्माती–*** कपूर २७) याची धाव कुंपणापर्यंत अशी एक म्हण आहे २८) बे दुणे ३१) साईबाबांचा एक संदेश–*** मालिक एक ३२) लाकडाचे गोदाम ३३) मावशीचा मुलगा ३४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ३५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ३७) तल्लीन, मग्न होणे ३९) जंगल, अरण्य ४३) एकाग्र, मग्न होणे ४४) एक अभिनेते–*** दामले ४६) फळातील गोड द्रव ४८) सूर्य (इंग्रजीत)

**आडवे शब्द :** १) श्रीरामाचा परमभक्त, वायुपुत्र ४) कोल्हापूर जिल्ह्यातील एक प्रसिध्द दैवत ७) श्री गजाननाचे एक नाव ९) लहान बाळाला ही टोचतात १०) मंदिराच्या शिखरावर हा बसवितात ११) परीट, धोबी १३) पराजय, जीतच्या विरूध्दार्थी १५) रांग १६) दम उलट लिहा १७) खर्चच्या विरूध्दार्थी १८) चार आणि तीन मिळून होणारी संख्या १९) आमीर खान अभिनीत एक चित्रपट–* इडियटस् २०) विश्वचषक (इंग्रजीत) २१) चाळीस आणि बारा मिळून होणारी संख्या २२) एक पेय, टी (मराठीत) २३) एक मराठी महिना २४) याच्यापासून शिरा बनवितात २५) गटर २६) सात गुणिले तीन २९) रक्षाबंधनवेळी बहीण भावाला बांधते ती ३०) एक जंगली हिंस्र पशु ३२) लग्नातील नवऱ्या मुलाची आई ३४) रांग, लाईन (हिंदीत) ३६) या कंपनीचे च्यवनप्राश प्रसिध्द आहे ३८) उन्हातान्हात भटकणे, **** फिरणे ४०) एक म्हण–दाम करी ** ४१) श्रीमंत (हिंदीत), शाहरूखचा एक हिंदी चित्रपट ४२) बनावट ४४) रयत, जनता, एक म्हण– जसा राजा तशी ** ४५) बोझा, वजन ४७) एक (इंग्रजीत) ४८) उत्सवाचा दिवस ४९) पर्जन्य ५०) निवडणुकीत उमेदवाराला मत देणे

## सुडोकु – 276

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 4 | | 2 | 6 | | 8 | | 1 |
| | 2 | | 5 | | 8 | 3 | | |
| | | 1 | | 3 | | | | |
| | 6 | 2 | | 4 | 7 | | 9 | 8 |
| 4 | | | | 5 | | | | 2 |
| 5 | | 8 | 1 | 9 | | 7 | 6 | |
| | 1 | | | 8 | 5 | | 2 | |
| | 8 | 7 | | | | 9 | 1 | |
| | | | 9 | 7 | | | 8 | |

# सिव्हिल इंजिनियरतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## तीनशे कामगारांचे यशस्वी तपासणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर सोलापूर व एन्व्हायरोसेफ कन्सल्टंट तर्फे सोलापूर शहरातील बांधकाम कामगारा करिता मोफत आरोग्य तपासणी शिबिर भरवण्यात आले होते. यात एकूण 300 कामगारांनी सहभाग घेतला होता.

अशोक चौक येथील पोलीस हेडकॉटर मध्ये भरविण्यात आलेल्या या मोफत आरोग्य तपासणी शिबिरचे उद्घाटन सोलापूरचे आयुक्त पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी वैशंपायन मेडिकल कॉलेजचे डीन ऋत्विक जयकर सर आवर्जून उपस्थित होते. तसेच असोसिएशनचे अध्यक्ष इंजिनियर बी एम जाधव, सचिव संतोषकुमार बायस यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी जागतिक पर्यावरण दिनाच्या औचित्य साधून मोफत आरोग्य तपासणी शिबिर सोबतच वृक्षारोपणचे कार्यक्रम देखील असोसिएशन च्या वतीने जोमात करण्यात आले.

कार्यक्रमाची प्रस्तावना असोसिएशनचे अध्यक्ष इंजिनियर भगवान जाधव यांनी केले तर आभार गोकुळ चितारी यांनी मानले तर सूत्रसंचालन कणकी मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंजिनिअर इफ्तिकार नदाफ, प्रशांत मोरे, गणेश इंदापुरे, मनोज महेंद्रकर, सुनील दूधगुंडी, जवाहर उपासे, नितीन पवार, बोगासर, मनोज व नामदेव म्हेत्रस यांनी परिश्रम घेतले. यासह असोसिएशनचे सर्व सदस्य या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामीभक्तांसाठी अन्नछत्रचा महत्त्वाकांक्षी संकल्प

## पाच मजली अत्याधुनिक महाप्रसादगृह उभारणीला वेग

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामीभक्तांची सेवा व नेहमीच सामाजिक बांधिलकी जोपासली जात आहे.सध्याचे महाप्रसादगृह भविष्यात वाढत्या भाविकांच्या संख्येमुळे अपुरे पडू शकते याचा विचार करुन मंडळाने पाच मजली वातानुकुलित महाप्रसादगृहाच्या निमीतीचा संकल्प केला.

दरम्यान मागील वर्षी गुरु पौर्णिमेच्या मुहूर्तावर सदर बांधकामाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आले.

या ठिकाणी दुसऱ्या मजल्यापर्यंतचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. १,१९,३९८ चौरस फुट इतक्या विशाल जागेवर महाकाय बांधकाम सुरु केले आहे.भक्तांच्या सोईसाठी सदरचे महाप्रसादगृह हे संपुर्णपणे वातानुकुलित असणार आहे. नियोजित महाप्रसादगृहात एकाच वेळी २५०० भक्त जेवणासाठी तर त्याच वेळी ५००० भाविक वातानुकुलित प्रतिक्षालयगृहात बसण्याची व्यवस्था असणार आहे.नियोजित महाप्रसाद ग्रहाच्या छतावर जवळपास ५१ फुटांची स्वामी समर्थांची मूर्ती, मेघ डंबरीसह अक्कलकोटच्या बाहेरून कोणत्याही दिशेने येणाऱ्या भाविकांचे लांबुनच लक्ष वेधून घेणार आहे. शेकडो वर्षे टिकेल असे मजबुत अन झालेल्या बांधकामात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याद्दष्टीने येथील काम सुरू आहे.अत्याधुनिक मटेरियल व अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर याठिकाणी सुरु असुन एप्रिल २०२७ पर्यत सदरचे बांधकाम पुर्ण होण्याच्या द्दष्टीने काम सुरू आहे.



अन्नछत्रच्या बांधकामात ब्लॅक जपान पेंटचा वापर करण्यात आला आहे. यामुळे झालेल्या बांधकामात कुठेही पाणी लागत नाही.जीआरसी (ग्लास रेनफोर्सड कॉंक्रीट) तंत्रज्ञानामुळे तीनही ऋतुपासुन बांधकामाचे शेकडो वर्षे रक्षण होते.तसेच बांधकामात २५ एमएम लेन्थच्या स्पेशल (५१ फुट अखंड)स्टीलमुळे मजबुती मिळाली आहे. मुख्य महाप्रसादगृहात ६६ फुट रुंदीपर्यंत कुठेही सपोर्ट नसताना स्लॅब आहे,ही खासीयत म्हणावी लागेल. सर्व बाबींची कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे या शासकीय संस्थेकडुन चाचणी करण्यात येत आहे.

महाप्रसादगृहाच्या बांधकामासाठी ५ टन क्षमता, १०० फुट उंच व १५० फुटी बुम असलेल्या क्रेनचा वापर करण्यात येत आहे.हे क्रेन सर्व बाजुंनी काम करते.तसेच कमी वेळेत जास्त वजनाचे काम करण्यास क्रेन उपयोगी पडत आहे.मजुरांची कमतरता यामुळे जाणवत नाही.

# आ.रोहित पवार यांच्या आंदोलनास संभाजी ब्रिगेड चा पाठिंबा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांना सरसकट कोणतीही अट न घालता सरसकट कर्जमाफी करण्यात यावी या मागणीसाठी पंढरपूर मध्ये अन्नत्याग आंदोलन उपोषणाला बसणारे आ. रोहित पवार यांना संभाजी ब्रिगेड सोलापूरच्या वतीने पंढरपूर येथे भेटून पाठिंबाचे पत्र सोलापूर जिल्हा संभाजी ब्रिगेडच्या वतीने देण्यात आले.

रविवार पासून पंढरपूर येथे शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी आणि कर्जमाफीतील जाचक अटी रद्द करण्याच्या मागणीसाठी १२ जूनपासून पंढरपुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बेमुदत 'अन्नत्याग' आंदोलन (उपोष) सुरू केले आहे शेतकऱ्यांच्या पाठीशी संभाजी ब्रिगेड नेहमीच उभा असून कर्जमाफी नसल्या कारणामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे अनेक शेतकऱ्यांनी आर्थिक कारणामुळे आत्महत्या केली आहेत त्यामुळे आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांसाठी जे उपोषण सुरू केले आहे त्या आंदोलनास संभाजी ब्रिगेडच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला.



यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले पंढरपूर विभाग जिल्हाध्यक्ष प्रदीप मिसाळ वकील आघाडी जिल्हाध्यक्ष गणेश कदम जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विक्रम वानकर पंढरपूर शहराध्यक्ष शनी घुले तालुकाध्यक्ष दीपक कवडे कैलास कणसे संतोष शिंदे मंगेश माने सुहास पोळ नागराज लवंड राजू शिंदे मल्हार गायकवाड रोहित गावडे सुदर्शन चौगुले शिवाजी ढवळ आदी उपस्थित होते.

# प्रा. डॉ सुनीलकुमार पाटील यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**सातारा (कटूसत्य वृत्त):-** ऑलिम्पियाड एग्जामिनेशन कौंसिल विद्यापीठने अंबोली (सावंतवाडी, सिंधुदुर्ग) येथे आयोजित केलेल्या पदवी वितरण समारंभात पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. सुनीलकुमार पाटील यांना गोव्याचे मा मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांच्या हस्ते अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण (Engineering and Technology) क्षेत्रातील डॉक्टरेट पदवी (Ph D) प्रदान करण्यात आली. सदर प्रसंगी ऑलिम्पियाड एग्जामिनेशन कौंसिल चे कुलगुरू डॉ आचार्य जगदीश सो, प्रमुख पाहुणे अरविंद परिशेट्टी, डॉ अनिलराव कुराडे, संचालिका सौ संगीता पाटील, प्राचार्य सुजित पाटील व मान्यवर उपस्थित होते. सदर प्रसंगी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदर डॉक्टरेट पदवी मिळाल्या बद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले तसेच भावी आयुष्या साठी शुभेच्या दिल्या.



# ग्रामपंचायती साठी १६ वा वित्त आयोग, स्वच्छतेसाठी ५० टक्के निधी राखीव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शाश्वत विकास ध्येय साध्य करणे साठी नवरत्न थीमची प्रभावी अंमलबजावणी केल्यास गाव स्वच्छ व समृध्द होईल. असे प्रतिपादन यशदा चे उप महासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आज ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत जिल्हा स्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करणेत आले होते.

या कार्यशाळेचे उदघाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचे हस्ते करणेत आले.

या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, यशदा चे प्रशिक्षक शांतकुमार स्वामी, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव प्रमुख उपस्थित होते.

१६ वा वित्त आयोग मधून ८० टक्के बेसिक ग्रॅन्ट मध्ये ५० टक्के स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन व पाण्याचे व्यवस्थापन बंधित निधी साठी खर्च करावा लागणार आहे. अबंधित निधीतून ५० टक्के खर्च करताना पंचायत विकास निदेर्शांक नुसार १ किंवा २ थीम संकल्प म्हणून केलेले थीम वर २५ टक्के निधी किमान खर्च केला पाहिजे. रस्ते कामांना २५ टक्के पेक्षा जास्त निधी खर्च करता येणार नाही असेही डॉ. कलशेट्टी यांनी सांगितले. घनकचरा व्यवस्थापन ला लक्ष द्या. सॅनिटरी नॅपकिन व डायपर यांची योग्य विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. प्रत्येक घरात चार डस्टबीन मध्ये कचरा चे विलगीकरण करणे होणे अपेक्षित आहे. हे काम ग्रामपंचायतीने देखील करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासनाचे योजना ग्रामपंचायतीचे स्वतः चे उत्पन्न व वित्त आयोग असे अभिसरनाद्वारे कामे हाती घेता येईल असे उपसंचालक कलशेट्टी यांनी सांगितले. ग्रामपंचायत विकास आराखडा बनवताना गुणवत्तेस महत्वाचे स्थान दिले आहे. ग्रामसभेत सर्व घटकांची उपस्थिती अत्यावश्यक आहे.




### गावपातळीवर कचरा वर्गीकरण आवश्यक - सिईओ कुशल जैन

सिईओ कुशल जैन यांनी जिल्हा व तालुका व गाव स्तरावर आराखडे तयार करून भरताना काळजी घ्या. जेणेकरून पुन्हा बदलाची वेळ येणार नाही याची दक्षता घ्या. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले सुचने नुसार ओला कचरा व सुका कचरा व घातक कचरा साठी डस्टबीन व कचरा चे विलगीकरण करणे आवश्यक असल्याचे सिईओ कुशल जैन यांनी सांगितले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी सर्व तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील आराखडे भरणे साठी नियोजन करावे असे आवाहन केले. या कार्यशाळेस यशदाचे प्रविण प्रशिक्षक शांतकुमार स्वामी, राजेंद्र वारगड, हनुमंत कांदे, भिमराव तुळजापूरे यांनी मार्गदर्शन केले.

# जिद्द चिकाटी, अभ्यासातून विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करावे

## डॉ. श्रीकांत येळेगावकर, ॲड. अभिजीत ढोबळे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आपल्या आई -वडिलांच्या कष्ट आणि संघषार्ची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर उज्वल यश संपादन करावे. उच्च पदस्थ अधिकारी व्हावे.आजचे युग हे स्पर्धेचे, ज्ञानाचे आणि कौशल्याचे असून विद्यार्थ्यांनी केवळ गुणांवर समाधान न मानता गुणवत्तेला प्राधान्य द्यावे. मोठी स्वप्ने पाहून ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी नियोजनबद्ध आणि सातत्यपूर्ण परिश्रम करणे आवश्यक आहे, असे मार्गदर्शन डॉ. श्रीकांत येळेगावकर, ॲड. अभिजीत ढोबळे यांनी केले.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या माध्यमातून सौ. सुमतीबाई दत्तात्रय येळेगावकर यांच्या सन्मानार्थ प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर आणि शाहू शिक्षण संस्थेचे सचिव ॲड. अभिजीत ढोबळे यांच्या देणगीतून पत्रकारांच्या पाल्यांना पत्र महर्षी रंगाअण्णा वैद्य स्मृती शिष्यवृत्ती आणि दिवंगत संपादक बाबुराव जक्कल स्मृती शिष्यवृत्ती वाटप समारंभ उत्साहात पार पडला. त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, महात्मा फुले सूतगिरणीचे चेअरमन ॲड. अभिजीत ढोबळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी केले. स्वागत कार्यकारणी सदस्य प्रीतम पंडित यांनी केले.



सूत्रसंचालन खजिनदार किरण बनसोडे यांनी तर उपाध्यक्ष आफताब शेख यांनी आभार मानले. यावेळी पत्रकार, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले, आज मिळालेले गुण हे यशाचे अंतिम मोजमाप नाही. गुणांपेक्षा गुणवत्ता अधिक महत्त्वाची आहे. गुणवत्ता ही अपघाताने मिळत नसून सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित असते.यशस्वी व्यक्तींच्या जीवनचरित्राचा अभ्यास करण्याचे आवाहन करताना त्यांनी जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, उच्च ध्येय आणि कठोर परिश्रम या गुणांमुळेच महान व्यक्तिमत्त्वे घडतात. स्वतःच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा उल्लेख करताना त्यांनी गिरणी कामगाराचा मुलगा म्हणून प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतल्याच्या आठवणींना उजाळा दिला.

### प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:मध्ये यशाची ठिणगी पेटवावी : ॲड. अभिजीत ढोबळे

ॲड. अभिजीत ढोबळे म्हणाले, बारावीनंतरच्या उच्च शिक्षणासाठी पालकांना मोठा आर्थिक संघर्ष करावा लागतो, याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावी. आई-वडिलांनी शिक्षणासाठी घेतलेले कर्ज आयपीएस, आयएएस, एमपीएससीसारख्या उच्च पदांवर जाऊन फेडण्याचा निर्धार प्रत्येकाने करावा. श्रमिक पत्रकार संघाने पत्रकारांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती व मार्गदर्शनाच्या माध्यमातून केलेले कार्य कौतुकास्पद आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:मध्ये यशाची ठिणगी पेटवून समाजात वेगळी ओळख निर्माण करावी तसेच पत्रकारांच्या लेखणीची ताकद समाजाला दिशा देणारी असून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे आवाहन ॲड. अभिजीत ढोबळे यांनी केले.

# नातेपुते येथे वाहतूक शाखेच्या पोलिसांकडून अनधिकृत पोलीस पाटी लावलेल्या वाहनावर कारवाई

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील पुणे पंढरपूर रोडवर लोणारी पेट्रोल पंप नजीक नातेपुते पोलीस ठाण्यातील वाहतूक पोलीस कर्मचारी हे नाका बंदी करत असताना भिगवन ता.इंदापूर जि.पूणे येथील चारचाकी महिंद्रा कंपनीची पांढऱ्या कलरची स्कार्पिओ वाहन नंबर एम. एच.४२ बी.जे.२१३५ या गाडीचा चालक संतोष कालिदास कदम रा. भिगवन जि.पूणे याने अनधिकृत पोलीस नाव असलेली लाल रंगाची पाटी लावली असता वाहतूक पोलीस कर्मचारी यांनी गाडीत लावलेली पाटी जप्त करून सदरील वाहनावर दंडात्मक कारवाई केली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, नातेपुते पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी सपोनी विशाल वायकर यांच्या आदेशाने नातेपुते येथील पुणे - पंढरपूर रोडवर लोणारी पेट्रोल पंप नजीक येथे नातेपुते पोलीस ठाण्यातील वाहतूक पोलीस कर्मचारी सुधीर हांगे, रमेश बोराटे व पोलीस कर्मचारी हे त्या ठिकाणी नाकाबंदी करत असताना अनेक येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांची तपासणी करीत होते. त्याच दरम्यान त्यांना समोरून येणारी पांढऱ्या कलरची महिंद्रा कंपनीची स्कार्पिओ वाहन नंबर एम. एच.४२ बी.जे.२१३५ ही गाडी दिसली त्यामध्ये चालकाच्या साईटला आत मध्ये डॅशबोर्डवर लाल रंगात पोलीस लिहिलेली पाटी दिसली असता सदर वाहन कोठून आले व कुठे चालले असे विचारले असता वाहन चालक संतोष कालिदास कदम यांनी भिगवन येथून आलो आहे व शिखर शिंगणापूर येथे देव दर्शनास निघालो असल्याचे सांगितले. त्यावेळी वाहतूक पोलीस कर्मचारी सुधीर हांगे, रमेश बोराटे यांनी वाहनामध्ये लावलेल्या पोलीस नावाच्या पाटी बाबत चौकशी केली असता सदर वाहनामध्ये लावलेली पोलीस नावाची पाटी ही अनाधिकृत असल्याचे निदर्शनास आले असून सदर गाडीत लावलेली पाटी जप्त करून स्कार्पिओ वाहनावर दंडात्मक कारवाई केली.अनेकदा वाहतूक पोलिसांकडून आपलं वाहन अडवलं जाऊ नये म्हणून आपल्या वाहनांवर लोक महाराष्ट्र शासन, पोलीस किंवा मग पोलीस बोध चिन्ह लावतात. जेणेकरून वाहतूक पोलिसांनी आपली अडवणूक करू नये असे वाटत असते मात्र पोलिसांच्या नजरेमधून असे प्रकार करणारे वाहन चुकू शकत नाही त्या वाहनांवर योग्य ती कारवाई केली जाते. त्यामुळे शक्यतो आपल्या खाजगी वापराच्या वाहनांमध्ये महाराष्ट्र शासन, पोलीस नावाच्या अनधिकृत पाट्या, लोगो यांचा वापर करू नये अन्यथा पोलीस कारवाईस सामोरे जावे लागेल असे आवाहन नातेपुते पोलीस ठाण्याकडून करण्यात आले आहे.




# पावसाळ्यापूर्वी महापालिकेची धडक कारवाई

## धोकादायक इमारतींमधून कर्मचाऱ्यांचे स्थलांतर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या बुधवार पेठ व सात रस्ता येथील निवासस्थानांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे सोलापूरचे प्रथम नागरिक तथा महापौर विनायक कोंडयाल यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली.

यावेळी बुधवार पेठ व सात रस्ता येथील महानगरपालिकेच्या निवासस्थाने अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या इमारतींमध्ये कोणतीही अनुचित अथवा दुर्घटनाजन्य घटना घडू नये, तसेच तेथे वास्तव्यास असलेल्या कर्मचाऱ्यांच्या जीवितास कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

बैठकीत महापौर विनायक कोंडयाल यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत, दोन्ही ठिकाणच्या जीर्ण इमारतींमध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी तातडीने स्थलांतर करावे, असे निर्देश दिले. संबंधित कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या स्तरावर पर्यायी निवासाची व्यवस्था करावी अथवा सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निवासस्थानी स्थलांतरित व्हावे, अशी माहिती त्यांनी दिली.



महापौरांनी प्रशासनाला या संदभार्तील कार्यवाही युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना देत, पावसाळ्यापूर्वी सर्व धोकादायक इमारती रिकाम्या करून नागरिक व कर्मचाऱ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले. तसेच कर्मचाऱ्यांना स्थलांतर प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक समन्वय साधण्याचेही आदेश देण्यात आले.

बैठकीत विविध पयार्यी निवासव्यवस्थांचा आढावा घेण्यात आला असून, सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षित व सुसज्ज निवास उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक ती पावले उचलण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, नगरसेविका रोहिणी तडवळकर, नगरसेवक अनंत जाधव, नगरसेवक विनायक विटकर, भरतसिंग बडूरवाले, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, उपाध्यक्ष, उपायुक्त आशिष लोकारे, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, कामगार नेते अशोक जानराव, साहेबराव गट्टू, प्रवीण कांबळे, बापूसाहेब सदाफुले, बाळासाहेब सुरवसे, अश्विनी चव्हाण, शेषराव शिरसाट, प्रीती उडाणशिवे, दशरथ अडकूल, सुभान स्वाके, पी. पी. जाधव, जनार्दन शिंदे, चांगदेव सोनवणे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी प्रतिनिधी उपस्थित होते.

सोलापूर महानगरपालिका आपल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत कटिबद्ध असून, पावसाळ्यापूर्वी सर्व आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# शेतकऱ्यांना सन्मानजनक कर्जमाफी द्या; जाचक अटी रद्द करण्याची युवासेनेची मागणी



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाने जाहीर केलेल्या सन २०२६ च्या कर्जमाफी योजनेतील जाचक अटी तात्काळ रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट व सन्मानजनक कर्जमाफी लागू करावी, अशी मागणी युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) करमाळा तालुक्याच्या वतीने तहसीलदारांमार्फत शासनाकडे करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले असून, राज्य शासनाच्या नव्या निकषांमुळे लाखो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात २०१९ मधील कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना २०२६ च्या योजनेत मर्यादित लाभ देण्याची अट अन्यायकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच ३१ मार्च २०२५ पर्यंतची सर्व थकीत पीककर्जे व मुदत कर्जाचा समावेश करून सरसकट कर्जमाफी लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ठेवण्यात आलेली 'चार वेळा कर्जाची परतफेड' ही अट रद्द करून सर्व नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सध्या दिल्या जाणाऱ्या ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहन अनुदानात वाढ करून ते १ लाख रुपये करण्यात यावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून कर्जमाफी योजनेतील सर्व जाचक अटी तात्काळ रद्द कराव्यात, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा युवासेनेच्या वतीने देण्यात आला आहे.